ISSN No. 2394-9996

# शोषित-उपेक्षितांचे अंतरंग उलगडविणारे अवचटांचे लेखन

**प्रा. डॉ. जी.पी. बोडखे**
आनंदाराव धोंडे महाविद्यालय कडा
ता. आष्टी जि. बीड.

मराठी गद्य परंपरेच्या संदर्भात विचार करता ललित गद्यांची परंपरा वैचारिक गद्य अशीही आहे. अनिल अवचटांचे लेखन वैचारिक ललित लेखनाच्या पातळीवर जाणारे आहे. महात्मा फुले, लोकहितवादी, आगरकर, श्री म. माटे, इरावती कर्वे, साने गुरूजी यांची परंपरा सांगणारे आहे. महाराष्ट्र आणि इतर प्रांत तसेच आंतरराष्ट्रीय समाजस्थितीचा यांच्या मनात ठसलेल्या विषयांचा अधिक जवळून केलेला अभ्यास त्यांच्या ललित लेखनात पहावयास मिळतो. माणूस म्हणून जगण्याची संवेदनशील जाणिव, तीव्र इच्छा ही अवचटांच्या प्रत्येक लेखांच्या गाभ्यात दिसून येते. वाचकांची जाणीव जागृत करून त्याला अंतर्मुख करण्याची सामर्थ्य त्यांच्या लेखनात आहे.

रूढ कथा, कादंबरी, नाटक, कविता या वाङ्मयाच्या प्रकारात न सामावणारे असे आणखी काही प्रकार शिल्लक उरतात. कोणत्याही बंदीस्त प्रकाराच्या चौकटीत सामावण्याची त्यांची तयारी नसते. विनोदी वाङमय, प्रवास वर्णने, शब्दचित्रे व व्यक्तिचित्रे, लघुनिबंधाच्या धरतीवरील ललित निबंधासारखे स्वैर लेख, आठवणी, स्मरणे, पत्रात्मक वाङमय, अनुभव इत्यादीची नोंद करण्यासाठी अलिकडे ललित गद्य (ललित लेखन) असा नवा साहित्यप्रकार स्थुलमानाने कल्पिला जाऊ लागला. त्यांच्या पोटात अनेक लहान मोठे उपप्रकार येऊन स्थिरावतात. अशाच ललित गद्याच्या जवळ जाणारे अवचटांचे लेखन दिसून येते.

अनिल अवचट यांच्या लेखनातील शोषित - उपेक्षितांचे अंतरंग कालक्रमानुसार पूर्णिमा (1969), वेध (1974), छेद )1979), माणसं (1980), संभ्रम (1980), वाघ्या मुरळी (1983), कोंडमारा (1985), धार्मिक (1985), धागे आडवे उभे (1986), गर्द (1986) अशा प्रसिद्ध झलेल्या लेख संग्रहातील लेखांमधून पहावयास मिळते.

शोषित उपेक्षितांचे अंतरंग उलगडताना अवचटांनी समाज जीवनातील विविध स्तर, त्यांचे विविधांगी विविध पैलुंसह दर्शन घडविले आहे. त्याचप्रमाणे माणूस व समाज यांचे आंतरसंबंध शोधत असतांना त्यांचे लेखन दिसून येते. खरे म्हणजे माणूसपणाचा शोध व समाजातील शोषित-उपेक्षितांचे अंतरंग उलगडविणारे लेखन हे वैशिष्ट्ये त्यांच्या संपूर्ण लेखनाचे आहेत.

सुरूवातीला एक गोष्ट नमूद करावयास हवी, अवचट यांच्या आजपर्यंच्या चाळीस बेचाळीस वर्षाच्या लेखनात जे विषय मांडले आहेत त्या सर्वांचे मूळ `वेध` मध्ये प्रत्ययाला येतात. यावरून अवचटांच्या एकूण व्यक्तीमत्वाच्या जीवनविषयक दृष्टीकोनाचा जो पिंड तयार झाला आहे त्याचे स्पष्ट दर्शन घडते. समाजाविषयी असणारी आस्था, बांधिलकी, पिडीतांच्या वेदनांनी येणारी अस्वस्थता, मूलगामी परिवर्तनाची मानसिकता, त्यासाठी बंडखोर निर्भिड वृत्ती व अत्यंत पारदर्शी प्रामाणिकपणा दिसून येतो. सर्वांगिण दृष्टी घेऊन एस.एम.जोशी, बाबा आढाव, युक्रांतदचे मित्र यांच्या सहभागातून आलेला समाजवादी संस्कार व पुणे, बिहार, महाराष्ट्र ते अमेरिका असे समाजविषयक व्यापक दर्शन त्यांनी वाचकांचे अंतःकरण पिळवटून घेतलेला माणसांचा वेध, पूर्णिमा लेखनकृतीतून घेतलेला आहे.

ग्रामीण भागातील कष्टकऱ्यांचे अज्ञान व दारिद्रय हे ईश्वरनिर्मित नसून त्याचे मूळ आपल्या समाजव्यवस्थेत आहे. हे महात्मा फुले यांना समजले होते. त्यांचे समजणे, समजून घेऊन खऱ्या अर्थाने महात्मा फुले असता प्रतिष्ठानचे कार्यकर्ते असलेले अवचट म्हणतात ``जी दुःखे मनुष्य निर्मित आहेत त्यांचा निरासही तो करू शकतो`` हा अश्वासक सूर समाजात निर्माण करून, तरूण माणसांना परिवर्तनाचे डोळस आव्हान स्विकारण्यास सांगतात. आत्मबल, संघर्ष, त्यागासह विधायक कार्यास वाहून घेण्याविषयी कार्यरत करतात. अवचटांनी उदार व व्यापक दृष्टी घेऊन `व्यक्ती व समाज` यांची प्रतिष्ठा अभिप्रेत धरून जीवनमूल्यांची जपणुक झाली पाहिजे. या धारणेने नियोजनबद्ध अभ्यासपूर्ण व वैचारिक भूमिका घेऊन कोणताही सर्वज्ञपणाचा आव न आणता सर्वांना समजेल अशा भाषेत आपले ललित लेखन केले आहे.

समाज व्यवस्थेतील जातीयता, विषमता, अज्ञान, दारिद्रय व अंधश्रद्धा या सर्व सामाजिक घटकांवर प्रकाश टाकला आहे त्याचबरोबर श्रीमंतांचा बेफिकीरपणा, मध्यमवर्गीयांची संकुचित मनोवृत्ती, पांढरपेशी लोकांची बौद्धीक गुलामगिरी व एकंदर सामाजिक न्यायाचा आढळणारा अभाव या सर्व गोष्टी वाचकांच्या निदर्शनास आणल्या आहेत. शारीरिक, मानसिक, आर्थिक शोषण, अंधश्रद्धा व व्यसनाधीनता

याकडे विशेष लक्ष दिले आहे. वाट (रस्ता) चुकलेल्या माणसाला, समाजाला पुन्हा रस्त्यावर आणण्याचे, त्यांना चांगला मार्ग दाखविण्याचे लोक कल्याणकारी कार्य करण्याचा अवचटांचा प्रामाणिक प्रयत्न दिसून येतो. तसेच त्यांनी या विषयीचे विवेचन त्यांच्या स्वतंत्र अशा शैलीतून केले आहे. त्यांची स्वतःची एक वेगळी लेखनशैली आहे. या विषयी विवेचन करतांना मे. पु. रेगे म्हणतात ``अवचट कोणत्याही परंपरेचे नाहीत आणि म्हणून मराठी साहित्यिक परंपरेतीलही नाहीत. त्यांच्या भाषेवर साहित्यिक शैलीतील संस्कार नाहीत. ती सडसडीत, सुटसुटीत, त्यांच्या पिढीच्या एकंदर धारणेला साजेशी फंक्शनल आहे. शैलीच्याकल्पनेने आलेला कोणत्याही प्रकारचा नवखेपणा तिच्यात नाही. आपल्या मित्रांशी ज्या भाषेत ते बोलत असतील त्याच भाषेत ते लिहितात. तिच्यात जे इंग्रजी शब्द भाषेच्या लकबी रूळलेल्या असतील त्या त्यांच्या लिखनात सहजपणे येतात. त्यांनी पाहिलेली आणि समजून घेतलेली माणसे, त्यांची परिस्थिती, त्यांचे बोलणे, चालणे, वागणे, त्यांचे विचार, राग, लोभ, आपल्यापुढे दाखल करणे एवढेच या भाषेचे काम आहे आणि ते ती अतिशय यशस्वीपणे करते.``

समाज न्याहाळत असताना अवचटांना ज्या व्यक्ती दिसल्या, बोलल्या ते त्यांनी जसेच्या तसे मांडले आहे. भाषेच्या माध्यमातून वास्तवाला त्यांनी महत्व दिले आहे. समाज वास्तवाचा विचार त्यांच्या समग्र साहित्यामधून अविष्कृत होतो. समाजा विषयी असलेली आस्था आणि तळमळीतून त्यांचे सर्व लेखन झाल्याचे दिसते. वास्तव चित्रण, सामाजिक बांधलकी, समाज परितर्वनाचा पुरस्कार, अशावाद, विशेष निरिक्षण, चिंतनशीलता, साधी, सोपी व अर्थवाही भाषाशैली इत्यादी अवचटांच्या लेखनाचे विशेष दिसून येतात.

अनिल अवचटांनी लेखसंग्रहामधून भोवतीच्या अराजकसदृश्य परिस्थिती लिहिताना त्यांनी कोणाचीही भीड ठेवलेला नाही. कोणी आप्तस्वकीय, मित्र दुखावले जातील याची त्यांना काळजी नाही. यामधून उद्या काही तोटे होतील याची खंत नाही. एक प्रांजळ निर्भिड व्यक्तीमत्व, अतिशय नितळ, लयदार शैलीमध्ये व्यक्त झ ाले आहे. कारण येथील वक्तव्यामागे आपण समाजाचे काही देणे घेणे लागतो याचे प्रबळ भान आहे. परंतु `हे सांगितले पाहिजे` अशी उर्मीही आहे. ही संपूर्ण शैली या उर्मीमुळे, समाजासंबंधीच्या आपले पणाच्या भावनेमुळे ओथंबून गेली आहे. तरीही एखाद्या कुशल शल्यविशारदाच्या थंडपणे आणि कौशल्याने भोवतीच्या अराजक सदृश्य वास्तवाचे दर्शन घडविले आहे.

अनिल अवचटांना वाटत आहे स्वातंत्र्यांनंतर सामान्य माणसांना चांगले दिवस पहावयास मिळतील आणि त्यासाठी या देशातील राजकिय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील लोक नैतिक जबाबदारी कृती करतील असे वाटत होते. पण तसे घडले नाही. स्वातंत्र्यपूर्व काळातील अमानुष गुलामगिरी लोकांना अनुभवास येऊ लागली. असाह्य गुलाम नव्या व्यवस्थेतही नव्या रूपात दारिद्रय आणि दुदैव यांच्या फेऱ्यात अडकले. केवळ दारिद्रय असेल तर त्यामधून माणसाची मुक्तता होऊ शकते. दारिद्रय आणि दुदैव वाटयाला आले की दुःखाचा कडेलोट होतो. संस्कृतीचे तथाकथित ठेकेदार अमानुष अन्याय, अत्याचार करत असतात. ही स्थिती स्वातंत्र्यानंतर, दारिद्रय आणि दुदैव यांच्या फेऱ्यात अडकलेला आडाणी, अज्ञानी श्रेष्ठ वर्गाने निर्माण केलेली संस्कृति, स्वतःच्या सुरक्षिततेसाठी त्यातील कल्पना, सिद्धांत आणि मूल्ये यासाठी वापरले. माणूस माणसातील संबंध माणूसकी सोडून स्वतःच्या जीवनाची सुसंगती वाढवण्यासाठी वापरली. सामान्यांच्या जीवनात उरले ते दारिद्रय आणि दुर्देव हे अवचटांनी अधोरेखित केले आहे.

अनिल अवचटांच्या 1985 मध्ये प्रसिद्ध झालेला `कोंडमारा` मधील लेख म्हणजे सत्तरीच्या दशकातील महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील, दलितांवरील अत्यांचारांच्या विविध अंगांनी घेतलेला शोध होय. `बावड्यांचा बहिष्कार`, `फलटण दंगल`, `वरळी दंगल`, `पारधी मेळावा`, `मराठवाडा दंगल`, `दोन घटना`, `सत्यभामेची विटंबना`, `एका गोसाव्याची तोड`, `पार्टीबाजीचे बळी` व `पोलिस कोठडीतील मृत्यू` अशा एकूण नऊ लेखांचा समावेश `कोंडमारा` पुस्तकामध्ये असला तरी `पारधी मेळावा` या लेखात पारधी समाजाच्या ह्दयस्पर्शी मानवी मन हेलावून टाकणाऱ्या कथा मांडलेल्या आहे. `एका गोसाव्याची तोड` मध्ये गावातील सवर्ण समाजातील गावगुंड बलुतेदारांच्या सुंदर स्त्रीयांची कशा प्रकारे विटंबना करतात याचे वास्तवदर्शी चित्रण मांडले आहे. बलुतेदार समाजातील एखाद्या व्यक्तीची हत्या झाल्यानंतर कोर्टात त्याच्या बाजूने साक्ष देण्यासाठी कोणी उभे राहत नाही ही जाती-जातीतील तेड अवचटांनी मांडली आहे.

`बावड्यांचा बहिष्कार` या लेखामधून बावडा गावातील शहाजीराव पाटील व त्यांचे गावगुाडदलित समाजावर बहिष्कार टाकतात. एकीकडे भारतीय लोकशाही प्रणालीमध्ये पंचवार्षिक निवडणूक प्रक्रियेला महत्व दिले आहे. राज्यघटनेत दलित - सवर्ण जातीय विषमता कमी व्हावी, समाज एकसंघ राहावा, दलितांना त्यांचे मानवी अधिकार मिळावेत यासाठी लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत सिमती, महानगरपालिका, नगर पालिका व ग्रामपंचायत निवडणूकीमध्ये राखीव जागा देण्यात

आलेल्या आहेत. पण राखीव जागेवर निवडून आलेले दलित उमेदवार वास्तवतेत दलितांच्या समस्या सोडवत आहेत काय? सवर्णांकडून दलितांवर अन्याय झाल्यानंतर ते आवाज उठवितात काय? दलित व्यक्ती मतदान करताना, सवर्ण समाजच्या मनगटशाहीला बळी न जाता मतदान करतात काय? सवर्णांनी सांगितलेल्या उमेदवाराला जर दलितांनी मतदान केले नाही तर त्याचा काय परिणाम होतो? या सर्व प्रश्नांची उकल सर्व बाजूंनी करण्याचा प्रयत्न अवचटांनी वास्तव घटनांचे वित्रण करून केला आहे.

`बावडा` गावातील शहाजी पाटील जि.प. निवडणुकीसाठी आवारे आडनावाच्या मातंग समाजातील व्यक्तीच्या राखीव जागेवर उभे करतात. त्याच्या विरोधात `कांबळे` बौद्ध समाजातील व्यक्ती फॉर्म भरतो. निवडणुक प्रक्रिया संपते पण नंतर बौध्द वाड्यावर स्पृश्य लोक बहिष्कार टाकतात. जो कोणी बौध्द व्यक्तीस शेतावर काम देईल, किराणा सामान देईल किंवा धान्य दळून देईल त्याला रू. 501/- दंड ठोठावण्यात येतो. एवढेच नाही तर शेतावर जाण्याचा बांधावरचा रस्तासुध्दा बंद करण्यात येतो. त्यामुळे गावातील बौद्ध दलित समाजाची खूप मोठी कोंडी निर्माण होते. उपासमारीची वेळ त्यांच्यावर येते. गावातील सवर्ण समाजातील व्यक्ती प्रतापराव सुर्यवंशी त्यांना धान्य रूपाने थोड्या फार प्रमाणात मदत करतो. तेव्हा सुर्यवंशीवरही पोलिस स्टेशनला खोट्या केसेस दाखल केल्या जातात. म्हणजे सगळीकडूनच दलितांचा कोंडमारा केला जातो.

देश स्वतंत्र होऊन अर्धे शतक लोटले तरी खेड्यामध्ये अजूनही शहाजी पाटलासारखे स्वतःचे राजकीय वर्चस्व गावात व तालुकयात टिकवून ठेवण्यासाठी दलित समाजावर अन्याय करताना दिसून येतात. जाती-जातीच्या डबक्यामुळे आजचा समाज पुर्णपणे विखुरला गेला आहे. याबाबीला आजही राजकिय व्यवस्था खतपाणी घालताना दिसून येते. ज्या माणसाकडे पैसा, मनगटात बळ व जात मोठी आहे. तेच लोक राजकारणात यशस्वी होतात. असे दाहक अनुभव प्रत्येक सामान्यांना येऊ लागले आहेत. अशा सवरुपाच्या एक ना अनेक घटना समाजामध्ये घडत आहेत. सर्वसामान्य माणूस त्या घटनांची वर्तमान पत्रामध्ये बातमी वाचतो. थोडसं चिंतन करतो आणि पुढे पोटाच्या खळगी भरण्यासाठी विवंचना करतो. हे सर्व अवचटांनी अगदी जवळून पाहिले आणि त्याच्या मुळापर्यंत शोध घेतला आहे. समाजातील कोमेजून जात असलेला मानवतावाद वाचकांसमोर मांडताना शोषित-उपेक्षित माणसाविषयी आत्मिक भाव प्रकट केला आहे. दलित, दंगलग्रस्त,

अंधश्रद्धा, व्यसनी, वेश्या, देवदासी, कामगार व विशिष्ट समाजाची होणारी उपेक्षा सहृदयतेने ते मांडतात.

आर्थिकदृष्टया जो मागासलेला आहे, जाती-व्यवस्थेमध्ये उपेक्षित आहे. त्या लोकांना माणसासारखी वागणूक मिळाली पाहिजे. त्यासाठी अवचट लेखन कार्याच्या माध्यमातून तरूण माणसांना डोळस आव्हान स्वीकारण्यास आत्मबल, संघर्ष, त्यागासह विधेयक कार्यास वाहून घेण्यासाठी कार्यरत असतात. नियोजनबद्ध, अभ्यासपूर्ण व वैचारिक भूमिका घेऊन कोणताही सर्वज्ञपणाचा आव न आणता सर्वांना समजेल अशा भाषेत शोषित - उपेक्षित माणसांचे अंतरंग उलगडवितात.

**संदर्भ सूची:-**

1) अनिल अवचट, धागे आडवे उभे, मॅजिस्टक प्रकाशन, मुंबई तृतीय आवृत्ती 2004.

2) मे.पु. रेगे, संभ्रम, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, तृतीय आवृत्ती 2001 .

3) अनिल अवचट, कोंडमारा, मौज प्रकाशनगृह, मुंबई, द्वितीय आवृत्ती.

☆☆☆